संच : अ

# ६ वी मराठी

**महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.**

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**

**शैक्षणिक प्रगती चाचणी**

**पायाभूत चाचणी २०१७-१८ : इयत्ता - सहावी**

**विषय : मराठी (लेखी)**

विद्यार्थ्याचे नाव : ______________________

शाळेचे नाव : ______________________ दिनांक : / /२०१७

केंद्र : __________ ता. __________ जि. __________ प्राप्त गुण : [ ]

हजेरी क्रमांक : [ ] तुकडी : ______ शिक्षकाची स्वाक्षरी __________ एकूण गुण : ४०

---

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.

एकदा मी एका शाळेत गेलो होतो. मुले प्रार्थना म्हणत होती. प्रार्थना संपल्यावर त्यांनी प्रतिज्ञा म्हटली. त्यांना मी विचारले, ''प्रतिज्ञेत पहिलं वाक्य काय आहे, 'भारत माझा देश आहे.' होय ना?'' मुले 'हो' म्हणाली. ''भारत 'आपला' देश आहे, असं न म्हणता 'माझा' का बरं म्हटलं असेल?'' मुले विचारात पडली.

मग मी सांगितले, ''वस्तू 'माझी' असं वाटतं, तेव्हा आपण तिची जितकी काळजी घेतो, तितकी 'आपली' म्हटल्यावर घेतोच असं नाही, म्हणून 'माझा' असा शब्द इथे वापरला, असं वाटतं का?''

मुले म्हणाली, ''बरोबर आहे. माझं घर-अंगण म्हटलं , की ते मी स्वच्छ ठेवतो. रस्ता मात्र आपला, म्हणून त्याच्यावर आपण घरातील घाण टाकतो.''

मी सांगितले, ''माणसाचं मन जसजसं मोठं होतं तसतसं 'माझी' ही कल्पनाही विस्तारत जाते. 'हे विश्वचि माझे घर' असं म्हणण्याइतकं संतांच मन मोठं होतं आणि त्यामुळे सगळीकडे जीवन स्वच्छ, निर्मळ व्हावं म्हणून त्यांनी प्रयत्न केले. महात्मा गांधी, विनोबा गावे, सेनापती बापट, सानेगुरुजी व संत गाडगेमहाराज हातात झाडू घेत व इतरांनाही घ्यायला शिकवत.''

**प्रश्न २.** प्रतिज्ञेतील पहिले वाक्य कोणते ते लिही. (गुण १)

______________________________

**प्रश्न ३.** आपल्या प्रतिज्ञेमध्ये 'आपला' ऐवजी 'माझा' हा शब्द का वापरला असेल? (गुण २)

______________________________

______________________________

**प्रश्न ४.** खालीलपैकी स्वच्छतेविषयी योग्य घोषवाक्य कोणते? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) स्वच्छता ज्याचे घरी, आरोग्य तेथे वास करी!

ब) झाडे लावा, झाडे जगवा!

क) नियमित पळा, आरोग्य सांभाळा!



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th \Proof-III\19-06-17\GJ

## संच : अ

**प्रश्न ५ ते ७ साठी :** ही कविता वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.

### पुस्तके

पुस्तके काही करू इच्छितात, तुमच्याजवळ राहू इच्छितात.

पुस्तकांत पाखरं चिवचिवतात, पुस्तकांत आखरं सळसळतात.

पुस्तकांत निर्झर गुणगुणतात, पुस्तकांत परीकथा ऐकवतात.

पुस्तकात रॉकेटचे तंत्र आहे, पुस्तकात विज्ञानाचा मंत्र आहे.

पुस्तकांची दुनिया न्यारी आहे, ज्ञानाची उत्तुंग भरारी आहे!

तुम्हांला नाही का जायचं? पुस्तकांच्या विश्वात?

पुस्तकं काही सांगू इच्छितात, तुमच्याजवळ राहू इच्छितात.

मूळ कवी - सफदर हाश्मी (अनुवादित)

**प्रश्न ५.** पुस्तकातील 'आखरं' पुढीलपैकी काय करतात? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) सळसळतात

ब) गुणगुणतात

क) चिवचिवतात

**प्रश्न ६.** पुस्तकांना तुझ्याजवळ का राहायचे आहे, ते तू तुझ्या शब्दांत लिही. (गुण २)

______________________________

______________________________

**प्रश्न ७.** पुस्तकाची दुनिया न्यारी आहे. असे कवी का म्हणत असावा असे तुला वाटते ते तू लिही. (गुण २)

______________________________

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th \Proof-III\19-06-17\GJ

## संच : अ

**प्रश्न ८ ते १० साठी :** ही बातमी वाच आणि त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.

**खडकाळ जमिनीवर फुलवली डाळिंबाची बाग**

**सिव्हिल इंजिनिअर एकनाथ शेवकर यांचा इंदोरीतील प्रयोग यशस्वी**

**इंदोरी, ता. २८ :** येथील प्रयोगशील शेतकरी एकनाथ शेवकर यांनी खडकाळ जमिनीवर डाळिंबाची बाग फुलवून नंदनवन निर्माण केले आहे. त्यांनी डाळिंबाचे भरघोस उत्पादन घेऊन प्रतिकूल परिस्थितीतही शेती यशस्वी करून दाखविली आहे.

तालुक्यातील डाळिंब शेतीचा हा पहिलाच व एकमेव प्रयोग असल्याचे त्यांनी सांगितले. सिव्हिल इंजिनिअर असलेले शेवकर चार वर्षांपूर्वी राज्य सरकारच्या पाटबंधारे खात्यातून सेवानिवृत्त झाले. त्यानंतर इंदोरी येथील वडिलोपार्जित शेतीत विविध प्रयोग करण्याचे ठरविले. त्यानुसार खडकाळ जमिनीचे सपाटीकरण केले. डाळिंबाच्या पिकाला निचरा होणारी जमीन व कमी पावसाची आवश्यकता असते. त्या प्रकारची लागवडीयोग्य जमीन तयार केली. १५ जुलै २०१३ ला राहुरी येथून भगवा जातीची रोपे आणून लागवड केली. दहा बाय आठ फूट याप्रमाणे १,३४१ रोपे लावली. दोन वर्षांनी पहिले पीक आले.

**प्रश्न ८.** एकनाथ शेवकर यांनी आपल्या जमिनीत डाळिंबाची किती रोपे लावली? (गुण १)

______________________________

**प्रश्न ९.** सिव्हिल इंजिनिअर असणारे शेवकर ४ वर्षांपूर्वी कोणत्या खात्यात काम करत होते? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण २)

अ) शेती विभाग     ब) हवामान विभाग     क) पाटबंधारे विभाग

**प्रश्न १०.** डाळिंबाच्या पिकाला कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते? (गुण २)

______________________________

______________________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th \Proof-III\19-06-17\GJ

## संच : अ

**खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव.**

**प्रश्न ११.** खालील वाक्यातील नाम ओळख. त्या नामाचा वापर करून नवीन वाक्य लिही. (गुण २)

सीमा शाळेत गेली.

नाम – ____________________

वाक्य – ____________________

**प्रश्न १२.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांऐवजी योग्य सर्वनामे वापरून वाक्ये पुन्हा लिही. (गुण २)

अब्दुल हुशार आहे. <u>अब्दुल</u> रोज अभ्यास करतो. <u>अब्दुलने</u> सर्व स्पर्धांमध्ये बक्षिसे मिळवली.

____________________

____________________

____________________

**प्रश्न १३.** खालील वाक्यातील विशेषण ओळख. त्या विशेषणाचा वापर करून नवीन वाक्य तयार करून लिही. (गुण २)

बागेत टवटवीत फुले होती.

विशेषण : ____________________

वाक्य : ____________________

**प्रश्न १४.** 'आईने पत्र लिहिले' या वाक्याचे खाली दिलेल्या काळात रूपांतर कर आणि वाक्य लिही. (गुण २)

१) वर्तमानकाळ : ____________________

२) भविष्यकाळ : ____________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th \Proof-III\19-06-17\GJ*

## संच : अ

**प्रश्न १५. अ)** पुढील वाक्यात अधोरेखित शब्दांऐवजी कंसातील योग्य वाक्प्रचार वापरून वाक्य पुन्हा लिही. (उत्तेजन देणे, दणाणून सोडणे, हुरळून जाणे.) (गुण १)

विश्वासला चांगले गुण मिळाल्याने सर्वांनी त्याला पुढील शिक्षण घेण्यासाठी <u>प्रेरणा दिली.</u>

________________________________________

________________________________________

**ब)** कंसात क्रियापद दिले आहे. त्याचे योग्य रूप तयार करून खालील वाक्यात लिही. (गुण १)

चंदूने झाडांना पाणी ........ (घालणे)

________________________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th \Proof-III\19-06-17\GJ*

**संच : अ**

**प्रश्न १६.** खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही.

पाऊस, गाय, डोंगर, दूध (गुण ५)

## संच : अ

**प्रश्न १७.** 'किशोर' या मासिकाच्या दिवाळी अंकासाठी 'मुलांच्या नजरेतून' या सदरामध्ये मुलांनी केलेले लेखन छापणार आहेत. त्यासाठी पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर लिही. (गुण ५)

१) दुष्काळ २) मुंगी ३) फळा

■■■



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th \Proof-III\19-06-17\GJ*